# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


जा.क्र./गो.वि./म.वि.वि.वि./ 229 / २०२४ दि. 05 / ०२ /२०२४

## परिपत्रक

विषय:- कॉलेज ऑफ दि इयर कप- २०२३ मध्ये सहभागी होण्याबाबत.

संदर्भ:- Ref. No.:MMS/1054/2024 Date: 22/01/2024.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये पहिल्यांदाच गोंडवाना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये महालक्ष्मी मल्टीपरपज सोसायटी, चंद्रपूर संस्थेमार्फत कॉलेज ऑफ दि इयर कप - २०२३ चा मेगा इव्हेंट घेण्यात येणार आहे. करीता प्राचार्य यांनी सदर इव्हेंटमध्ये सहभागी होण्यासाठी संदर्भीय पत्राचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही घ्यावी.

सहपत्र:- संदर्भीय पत्र संलग्नित.

मा प्र-कुलगुरु यांच्या मान्यतेने

( देवेंद्र एम. झाडे )
उपकुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Reg. No. F-12358

Mahalaxmi Multipurpose Society, Chandrapur

# D's Event Management & Solution

## College of the Year Cup - 2023

**Ref. No.:** MMS/1054/2024 गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली आवक/जावक विभाग **Date:** 22/01/2024

आवक 14378 दि. 23/1/24

जावक 14378 दि. 23/1/24

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवाचे कार्यालय
आवक क्र. 751 दि. 23/1/24
जावक क्र. 849 दि. 24/1/24

**प्रति,**

**मान. कुलसचिव**

**गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली**

विषय: कॉलेज ऑफ दि इयर कप –२०२३ मध्ये सहभागी होण्याबाबत.

मान. महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास सूचित करण्यात येत आहे कि, शैक्षणिक सत्र २०२३–२४ मध्ये पहिल्यांदाच गोंडवाना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये आमच्या संस्थेमार्फत कॉलेज ऑफ दि इयर कप – २०२३ चा मेगा इव्हेंट घेण्यात येणार असून या इव्हेंट मध्ये आपल्या कार्यक्षेत्रातील गडचिरोली जिल्ह्यातील एकूण २५ तर चंद्रपूर जिहल्यातील २५ महाविद्यालय या इव्हेंट मध्ये सहभागी व्हावे अशी आशा आहे.

महोदय, या इव्हेंट मध्ये क्रीडा, सांस्कृतिक, बौद्धिक असे एकूण १५ इव्हेंट होणार असून प्रत्येक महाविद्यालयास या स्पर्धेमध्ये टिकून राहण्याकरिता किमान १३ इव्हेंट मध्ये सहभागी होणे गरजेचे आहे जे महाविद्यालय जास्तीत जास्त इव्हेंटमध्ये यशस्वी होतील त्यांना कॉलेज ऑफ दि इयर कप –२०२३ च्या अंतिम फेरी मध्ये प्रवेश देण्यात येईल व त्यामधून आपल्या एका महाविद्यालयास कॉलेज ऑफ दि इयर कप –२०२३ ने सन्मानित करण्यात येईल

तरी आपणस आग्रहाची विनंती आहे कि आपण आपल्याशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना याची आपल्या स्तरावून माहिती द्यावी व हा इव्हेंट यशस्वी होण्यास सहकार्य करावे. हि विनंती

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
आवक क्र. 3213 दिनांक 24.1.24
जावक क्र. ........ दिनांक ........

सोबत: १) इव्हेंट चे नियम व अटी

२) बॅनर आपल्या संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता

इव्हेंट दीनांक :- 25,26,27,28 फेब्रुवारी, 2024

Ruchikachaudhari
रुचिका चौधरी
मॅनेजिंग डायरेक्टर

## कॉलेज ऑफ दि इयर कप – २०२३ चे नियम व अटी

१) कॉलेज ऑफ दि इयर कप मध्ये सहभागी होणाऱ्या सर्व महाविद्यालयास किमान १३ इव्हेंट मध्ये सहभागी होणे आवश्यक आहे.

२) गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील महाविद्यालयाचे इव्हेंट हे आपापल्या जिल्ह्याच्या ठिकाणी होतील.

३) उपांत्य व अंतिम फेरी हि आयोजकांच्या निर्णयानुसार चंद्रपूर जिल्ह्याच्या ठिकाणी घेण्यात येईल.

४) कॉलेज ऑफ दि इयर चा निर्णय एकूण १५०० गुणांच्या आधारावर घेण्यात येईल.

५) ज्या महाविद्यालयास १००० ते १२०० गुण प्राप्त होतील ते सर्व महाविदयालय उपांत्य व अंतिम फेरी साठी पात्र होतील

६) परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल

७) इव्हेंट मध्ये सहभागी होणारे सर्व विद्यार्थी हे महाविद्यालयातील नियमित प्रवेशित विद्यार्थी हवे माजी विद्यार्थी अथवा महाविद्यालयाच्या बाहेरील विद्यार्थी या मध्ये प्रवेशित झाल्यास त्या महाविद्यालयास स्पर्धेतून बाद करण्यात येईल

८) सहभागी विद्यार्थी हा किमान १८ ते २२ च्या वयोगटातील असायला हवा.

९) प्रत्येक महाविद्यालयातून १५ स्पर्धक व ०१ समन्वयक या इव्हेंट करीत येणे अपेक्षित आहे.

१०) सांस्कृतिक कार्यक्रमध्ये ग्रुप डान्स असल्याने त्यामध्ये महाविद्यालयातील किमान ६ किंवा ८ विद्यार्थ्यांचा ग्रुप असायला हवा त्यापेक्षा जास्त असू नये.

११) अधिक माहितीसाठी ९३७०३६३५२१ या क्रमांकावर संपर्क साधावे

१२) महाविद्यालयाची नोंदणी हि स्पर्धा शुल्क भरल्यानंतरच कायम समजण्यात येईल.